# मराठी संगीत समीक्षा - काही उणीवा

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - साहित्य सहकार, संपा. ग त्र्यं माडखोलकर, साहित्य सहकार संघ लि., मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय प्रकाशन, एप्रिल १९६९)

मराठीतील संगीतसमीक्षेचा स्वतंत्र विचार करू इच्छिणाऱ्यास प्रथमतःच एक अडचण जाणवेल. ती म्हणजे संगीतसमीक्षेला मराठी लेखनात परंपरा नाही ही होय. इंग्रजी अंमलापासून मराठी साहित्यसमीक्षेने मुळे धरण्यास सुरुवात केली आणि परपुष्ट का होईना पण डोळ्यांत भरण्याइतक्या प्रमाणात व सूक्ष्म परिशीलन केल्यास गुणवत्तेच्याही बाबतीत लक्षात घेण्याजोगी एक परंपरा निर्माण झाली. परंतु इतर ललितकलांच्या समीक्षेबाबत मात्र असे काही घडले नाही. परंपरेचा उपयोग निदान पुढच्या प्रयत्नांना आधार म्हणून होत असतो. परंपरेच्या मूलार्थातच मुळी एक सहेतुक प्रयत्नशीलता, एक निश्चित असा ग्रहणक्षम वाचक-श्रोता वर्ग, आणि झाल्या प्रयत्नांवर साधकबाधक चर्चा करण्यास उन्मुख असणारा विचारवंताचा समूह इ.चा समावेश होत असल्याने कोणत्याही वैचारिक व्यवहाराच्या दृष्टीने परंपरा असणे ही गोष्ट फार महत्त्वाची ठरते. आणि या पार्श्वभूमीवर परंपरा नसणाऱ्या मराठी संगीतसमीक्षेची आजची केविलवाणी अवस्था म्हणजे एक क्रमप्राप्त दुर्दैवी वारसा आहे असे वाटू लागते. साहित्यसमीक्षेबरोबरच कलासमीक्षाही मराठीत का उदयास आली नाही हा एक स्वतंत्र विचारविषय आहे. प्रस्तुत विचार फक्त आजच्या संगीतसमीक्षेच्या स्वरूपासंबंधीच होय.

संगीतसमीक्षा म्हणजे संगीतविषयक व्यक्तिगत आणि आत्मसापेक्ष विधाने नव्हेत हे समीक्षेचे मूलतत्त्व अजून आजच्या मराठी संगीतसमीक्षेत रूजले नाही असे वाटते. याचा परिणाम असा झाला आहे की आमची संगीतसमीक्षा एक तर समीक्षकाची संस्मरणे आणि त्याची व्यक्तिगत संवेदने यांच्या पातळीवर तरी वावरते, किंवा ही समीक्षा साहित्यसमीक्षेतून उसन्या घेतलेल्या संज्ञांच्या आणि उपपत्तीच्या चौकटीत संगीतकलेस व तिच्या आविष्करणास बसवू पाहाते. कलाकृतीचे मूल्यमापन करण्याची आयुधे व्यक्तिगत संवेदना आणि बाहेरून आणलेल्या उपपत्ती याद्वारे मिळाल्यावर समीक्षा आपल्या कार्यात यशस्वी कशी होणार? कलाव्यवहारातून हाती लागणाऱ्या निकालावरच समीक्षेचा डोलारा उभा राहात असतो आणि रेडीमेड उपपत्ती, आयात केलेला संज्ञासंभार, व साचेबंद प्रतिक्रिया टाळून कलाकृतींना सामोरे जाणाऱ्या रसिकांच्या सादांमधून (responses) कलाव्यवहार सिद्ध होत असतो. "बालगंधर्वांचे संगीत स्वर्गीय होते" हे व्यक्तिगत पसंतीची तमपातळी दर्शविणारे मूल्यविधान असले तरी याचा ढोबळपणा समीक्षेस साहाय्यक नाही. "गंधर्व संगीत हे जयपूर गायकीवर आधारलेले होते. कारण त्यांचे गुरु हे त्या गायकीचे निष्ठावंत पुरस्कर्ते होते" हेही विधान संबंधित प्रत्यक्ष गायनव्यवहारापेक्षा बाहेरून आणलेल्या सिद्धांतचौकटीवर आधारलेले असल्याने समीक्षेस उपकारक नाही. संगीतसमीक्षेस पायाभूत ठरणारे आणि चर्चा आणि विचारांची देवघेव यांना वाव देणारे विधान या संदर्भात उदाहरणादाखल द्यायचेच झाले तर "गंधर्व संगीत हे नाट्यसापेक्ष, अभिजात संगीत होते" या विधानाचे देता येईल. या विधानात विशिष्ट संगीत व्यवहाराचे विशिष्ट संदर्भातले स्वरूप, या स्वरूपाने ज्यातून आपले बीज शोधले तो मूळ व्यापार आणि यांच्या क्रिया प्रतिक्रियांमुळे हाती लागणारे निष्कर्ष इ. चे दिग्दर्शन झाले आहे. यातील सहज नजरेस येणाऱ्या व गर्भित असणाऱ्या प्रत्येक मुद्यावर चर्चा शक्य आहे आजच्या समीक्षेत अशी विधाने औषधालाच सापडतात ही पहिली उणीव होय.

या तऱ्हेची संगीतस्वरूपावर आधारलेली समीक्षा मूळ धरू न शकल्याचे महत्त्वाचे कारण असे की संगीताविषयी बोलणे, लिहिणे वा विचार करणे या विषयी आमच्या क्रियाशील संगीतकारात एक विलक्षण तुच्छतागंड मुरलेला आढळतो. या कलेचे बहुसंख्य अभ्यासक हे अशिक्षित असल्याने हा तुच्छतागंड एखाद्या ढालीसारखा पुढे केला जात असे. आपल्या संगीतशिक्षण

पद्धतीतल्या उणीवा, आमच्या गुरुपरंपरेतील कलाहानी करणारे पण चिवट असे काही घटक यांचाही या कारणपरंपरेत उल्लेख केला पाहिजे. परंतु सर्वात महत्त्वाचा गैरसमज म्हणजे अशा तऱ्हेने विचार करणारा कलावंत होऊ शकणार नाही हा होय. ‘विचार हा बुद्धिप्रेरित, रुक्ष आणि म्हणून कलाहानीकारक, व कला ही हृदयप्रेरित, भावनापूर्ण व म्हणून कलायुक्त’ अशी एक सहज समजण्याजोगी व अतिशय ढोबळ विचारधारा संगीतकारात प्रचलित होती. वास्तविक कलाव्यवहारात विचार अनुस्युत आहे आणि त्याला सुसंगत शब्दरूप देण्यानेच एकदम कलाव्यवहार व त्याच्या शक्यता नष्ट व्हाव्यात इतकी काही स्वरूपगत भयानकता त्या क्रियेत नाही. पाश्चात्त्य संगीतकार हे संगीतकार राहूनही जर संगीताविषयी महत्त्वपूर्ण विचार करू शकले व मांडू शकले तर आम्हालाच ते अशक्य का वाटावे? याला कारण आमच्या एकंदर संस्कृतीची सखोल परीक्षा केल्यावरच मिळेल असे वाटते. संगीतकारांनी संगीताविषयीचा आपला विचार शब्दरूप करावा, लिहावे, बोलावे. त्यातूनच संगीतसमीक्षेला चैतन्यदायी तत्त्वाचा लाभ होईल. आजपर्यंत साहित्यिकांनी संगीतसमीक्षा केली. यांच्या भाषाप्रभुत्वाचे दडपण संगीतकारांनी आपल्या मनावर पडून घेण्याचे कारण नाही. आपला विचार जमेल तसा त्यांनी व्यक्त करावा; त्याचे व्यवस्थितीकरण, त्याचे संस्करण, परिष्करण इ. क्रियांची त्यांनी चिंता करू नये. असे झाले तर संगीतसमीक्षेला संगीताचा संदर्भ प्राप्त होईल.

आमच्या संगीतसमीक्षेत आणखी एक उणीव भासते ती तिला पायाभूत असलेल्या तात्त्विक बैठकीबाबत. विशिष्ट कलाकृतीचे सौंदर्यग्रहण, कलेच्या संदर्भात विशिष्ट कलाकृतीवर केलेली टीका, एकंदर कलेतून हाती लागणाऱ्या सौंदर्यतत्त्वांचे व्यवस्थितीकरण आणि सर्व कलांतून आढळणाऱ्या मूलतत्त्वांचे आणि त्यांच्या परस्परसंबंधांचे तात्विक विश्लेषण; या चार पातळयांमधील सूक्ष्म भेद आमच्या संगीतसमीक्षेला जाणवले आहेत असे दिसत नाही. या पातळ्या म्हणजे जरी पाणीबंद कप्पे नसले तरी यातील भेदरेषा निश्चित व समजणारी आहे. प्रयागला गंगा-यमुना मिळतात आणि त्यांचे पाणी एकमेकांत मिसळूनही जाते, पण संगमरेषा स्पष्ट दिसते तसाच प्रकार या चार आकलनपातळयांबाबतीत आहे. हे लक्षात न घेता कार्यप्रवृत्त झालेली समीक्षा सदाच चाचपडती रहाणार. पहिली पातळी म्हणजे परीक्षण, दुसरी ती टीका, तिसरी पातळी समीक्षेची म्हणजे कलासंबद्ध सौंदर्यशास्त्राची आणि चौथी सौंदर्यशास्त्रीय तत्वज्ञानाची, अशी या चार पातळयांची फोड होय. (या मुद्द्याआधीच्या लेखाच्या भागात समीक्षा ही संज्ञा संगीतस्वरूपाचे वैचारिक आकलन या ढोबळ अर्थानेच वापरली आहे.) बागेश्री रागाची एखादी ध्वनिमुद्रिका ऐकून वा एखाद्याने गायला-वाजवलेला बागेश्री प्रत्यक्ष ऐकून या आविष्काराच्याच संदर्भात, त्यातूनच मिळणारे निकष घेऊन आविष्काराच्या कलापूर्णतेविषयी निर्णय घेणे ही परीक्षणपातळी होय. याच आविष्काराची संगीताविष्कारांतर्गत सर्वसामान्य तत्त्वांची संदर्भात पाहणी करणे ही टीकापातळी होय; आणि संगीतव्यवहारात सार्वत्रिक असणाऱ्या स्वर-लय इ. तत्त्वांची व्यवस्थित रचना करणे ही समीक्षा होय. हीच पातळी विशिष्टकलासंबद्ध सौंदर्यशास्त्राची होय. कलाजीवन आणि व्यक्तीजीवन यांचे संबंध वा भावना-बुद्धी व्यवहारांचे नाते इ. विषयी तात्विक विश्लेषण ज्या चौथ्या पातळीवर होते ती तात्विक सौंदर्यशास्त्राची होय. या विचारप्रवर्तनास निखळ तत्वज्ञान म्हणता येणार नाही. कारण याही पातळीवर विचाराधीन असलेले प्रश्न कलाव्यवहाराशी काहीसे अप्रत्यक्ष पण निश्चित असे नाते राखून असतात.

या सर्व पातळयांवर सकस लेखन होणे आवश्यक आहे. यावर संगीताचे आकलन अवलंबून आहे. सरसकट विधाने, गोलमाल, ‘साक्षात्कारी आणि चमत्कारी’ गूढार्थी विशेषणांनी खेचून भरलेले लिखाण, आणि परिणामत: विचारक्षेत्रातून संगीताची होणारी हकालपट्टी यातून सुटण्यासाठी कलासमीक्षकांना आणि विशेषतः संगीतसमीक्षकांना कोणती पथ्ये पाळावयास हवीत याचे अल्पसे दिग्दर्शन वर केले आहे. यातून अधिकाधिक विचारमंथनास आरंभकारण मिळावे अशी अपेक्षा आहे.

---